जिल्हा परिषद जालना
उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जालना
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती परिसर,
कचेरी रोड, जालना पिन कोड -431 203
दूरध्वनी क्रमांक - 02482-225510 ई-मेल- jalna@umed.in

जा.क्र./MSRLM/ Livelihood/ 924 /2026 दिनांक- 20 / 11 2026

दरपत्रक

प्रति,

विषय - जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)सन २०२५-२६- नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्ती अभियान, जालना अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना सोलर ड्रायर पुरविण्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

1. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जालना अंतर्गत जालना जिल्हयामध्ये स्वयंसहाय्यता गट उत्पादक गट व महिला शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत शेतीवर आधारीत विवीध उत्पादने उत्पादीत करीत आहेत. (जसे भाजीपाला, मशरूम, मसाले, मोरींगा इ) त्यांच्या उत्पादनांसाठी साठवण कालावधी वाढविण्यात येऊन त्यांच्या उत्पादनाचे मुल्यवर्धन करण्यासाठी स्वयंसहाय्यता गटांसाठी सोलर ड्रायर उपलब्ध करून देण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	विवरण	एकुण नग
१	**Cabinet Style Solar Dryer** Dimension (LxB) 1x0.8 M Aperture area 0.8 Sq.M Drying Trays -Stainless Steel (SS) Mesh Type Load Capacity- 5 KG(Wet Input) Drying Time 6-20 Sunshine Hr. Including off all taxes and installation & Transportation cost	01 नग

- उपरोक्त दिलेली संख्या ही अंदाजीत असुन त्याचा मुल्यमापनासाठी विचार करण्यात येईल तसेच त्यामध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना बदल होऊ शकतो. तसेच आवश्यकते नुसार वेळोवेळी पुरवठा आदेश देण्यात येईल.

1. **दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची प्रमाणपत्रे**
   A) PAN CARD जोडावे व मागील वर्षाचे आयकर रिटर्न दाखल केल्याचे प्रमाणपत्र B)SHOP & ESTABLISHMENT ACT अंतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र किंवा इतर सक्षम प्राधिकरण अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे C) GOODS & SERVICE TAX REGISTRATION प्रमाणपत्र जोडावे. D) उपरोक्त वस्तुंचा पुवठा करण्याचे अधिकृत कंपनी विक्रेता प्रमाणपत्र.
2. **बोलीचे/निविदा/देऊ केलेलेमूल्य**(Bid Price)
   अ) पुरवठादाराने अदा करावयाचे सर्व शुल्क, कर व अन्य उपकर दरामध्ये समाविष्ट करावेत.
   आ) वस्तु/सेवांचे दर खुल्या बाजार भावानुसार सुसंगत किंवा मिळते जुळते असावेत.

ई) दुरुस्ती असल्यास त्यावर काट मारून, छोटी स्वाक्षरी करून तारीख लिहून पुन्हा योग्य असेल ते लिहावे.

3. प्रत्येक पुरवठादाराने फक्त एकच दरपत्रक सादर करावे.
4. दरपत्रकाचीवैधता : दरपत्रक सादर करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या शेवटच्या तारखे पासून 90 दिवसांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीसाठी दरपत्रक वैध राहील.
5. **दरपत्रकांचे मूल्यमापन** : सर्व दरपत्रकांचे मूल्यमापन व तुलना करून ठोस प्रतिसाद देणाऱ्या म्हणजेच व्यवस्थित स्वाक्षरीत असलेल्या व नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींशी अभिसंगत असणाऱ्या दरपत्रकांचे **सर्व बाबींचे मिळून** मूल्यमापन केले जाईल.
6. निवड झालेल्या पुरवठादारास रु. 100/- च्या मुद्राक शुल्क (Bond Paper) वर करार करुन दयावा लागेल त्याचा खर्च पुरवठादारास करावा लागेल.
7. पुरवठाधारकाच्या कुठल्याही साहीत्याच्या नुकसानाची /जतन करण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.
8. स्विकृत निविदेतील दरानुसार साहीत्याचा दर्जेदार पुरवठा जालना जिल्हया अंतर्गत तालुक्यातील गावामध्ये करणे व सोलर ड्रायर चालविण्याचे प्रशिक्षण संबधित स्वयंसहाय्यता गटातील महिलांना देणे बंधनकारक राहील.
9. पुरवठा करण्यात येत असलेले सोलर ड्रायर ची 02 वर्षाची विनामुल्य वारंटी देणे बंधनकारक राहील
10. पुरवठा करण्यात येत असलेले सोलर ड्रायरचा तांत्रीक तपासणी अहवाल सक्षम प्राधिकरणाकडुन घेणे व पुरवठा करण्यात आलेल्या स्वयंसहाय्यता गटाची पोच पावती व GPS फोटो देयका सोबत सादर करणे बंधनकारक राहील त्याशिवाय देयक अदा करण्यात येणार नाही.
11. पुरवठा केल्यावर व त्याचा स्वीकार केल्यानंतर देयक अदा केले जाईल व देयकातुन शासनाच्या प्रचलित नियमानुसार आयकर, विक्रीकर रक्कम कपात करण्यात येईल.
12. वर जरी काहीही म्हटले असले, तरी सुद्धा कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे, खरेदीप्रक्रिया रद्दकरण्याचे व कंत्राट बहाल करण्याआधी सर्व दरपत्रक फेटाळण्याचे अधिकार खरेदीदार राखून ठेवीत आहेत.
13. सोलर ड्रायर चे दरपत्रक असे शिरोरेखीत लिहिलेल्या सील बंद लिफाफ्या मध्ये सर्व दस्तऐवज व विहीत नमुन्यातील साहीत्य व सेवेचे दर. दि.27/ 11/2026 रोजीच्या दुपारी १३.३० वाजेपर्यंत ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती परिसर, जालना येथे सादर कराव्यात.
14. पुरवठादारांच्या प्रतिनिधींच्या समक्ष दि.30 / 11/2026 रोजी दुपारी १५.३० वाजता दरपत्रक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पंचायत समिती परिसर, जालना येथे खुल्या केल्या जातील.
15. दरपत्रक सादर करण्यासाठीच्या निर्धारित कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रक फेटाळल्या जातील

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

दरपत्रकचा नमुना (पुरवठादाराच्या लेटरहेड वर, उपलब्ध नसल्यास पुरवठादाराचा शिक्का)

दिनांक / /2026

प्रती,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,जालना.

विषय - विषय - जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)सन २०२५-२६- नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्ती अभियान, जालना अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना सोलर ड्रायर पुरविण्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

संदर्भ : आपले दिनांक / /2026 चे दरपत्रक सादर करण्याबाबतचे विनंती पत्र.

महोदय,
आपल्या गरजेनुसार अतिशय रास्त व स्पर्धात्मक दर असलेली दरपत्रक खालील प्रमाणे सादर करीत आहोत

अ.क्र.	विवरण	प्रती नग	एकुण रक्कम रूपये
१	**Cabinet Style Solar Dryer** Dimension (LxB) 1x0.8 M Aperture area 0.8 Sq.M Drying Trays -Stainless Steel (SS) Mesh Type Load Capacity- 5 KG(Wet Input) Drying Time 6-20 Sunshine Hr. Including off all taxes and installation & Transportation cost	01 नग	

वरील नमूदवस्तू दरपत्रकसाठीच्या विनंतीमधील तांत्रिक विनिर्दिष्टाला अनुसरून व इतर अटी व शर्ती नुसार एकूण कंत्राट मूल्य रु _____ (आकड्यांमध्ये) रुपये _____(शब्दांमध्ये) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत सेवा पुरविण्यास आम्ही तयार आहोत. सदरील साहीत्य पुरवठा करण्यात विहीत वेळेत करण्यात येईल.

सेवा पुरवठादाराची शिक्क्यासहित स्वाक्षरी